## रे.मु.नं १३/२००८ मधील निशाणी क्र.५१ खालील आदेश

वादीतर्फे निशाणी क्र.५१ वरती अर्ज हा कमिशन अहवाल परत उपअधिक्षक, भूमिअभिलेख, माळशिरस यांच्याकडे पाठविण्यासाठी दाखल केलेला आहे. या अर्जावर प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी निशाणी क्र.५२ वरती म्हणणे देवून विरोध केलेला आहे.

**२)** वादी, प्रतिवादी क्र.३ व ४ यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले. खालील वाद प्रश्नांचे कारणसह उत्तर देत आहे ते खालीलप्रमाणे.

| | वाद प्रश्न | | उत्तर |
|---|---|---|---|
| १. | वादीने कमिशन अहवाल पुन्हा परत पाठविण्यासाठी योग्य व संयुक्तिक कारण दिलेले आहे का ? | ... | **नाही** |
| २. | काय आदेश ? | ... | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

### ::का र ण मि मां सा::

### वाद प्रश्न क्र. १ बाबत

**३)** वादीचे अर्जामध्ये कथन की, वादीने दावा मिळकतीची मोजणी होवून हद्दीखुणा कायम होवून मिळण्यासाठी व निरंतराच्या ताकीदसाठी दावा दखल केलेला आहे. त्यानुसार निशाणी क्र.४९ सोबत कमिशनचा अहवाल सादर केलेला आहे. त्यामधील पान क्र.१२९ वरती मोजणीचा नकाशा 'अ' आलेख दाखल केलेला आहे. त्यामध्ये निळया रंगाने दर्शविलेले क्षेत्र वादी यांचे असून सध्या ते क्षेत्र प्रतिवादी क्र.३ व ४ यांच्या वहिवाटीत आहे. ते क्षेत्र २० आर आहे. परंतू सदरच्या नकाशात दर्शविलेले क्षेत्र निळया रंगाने दर्शविलेले आहे. त्या क्षेत्राच्या चारही बाजूच्या खुणा अ, ब, क, ड ने दर्शविणे आवश्यक आहे परंतू तसे दर्शविले नाही. सदर २० आर क्षेत्र वादी यांचे गट नं. ७८/२/२/१ व गट नं. ७८/१/२/२ असे दर्शविलेले आहे. ते चुकीचे आहे. वादीचे गट नं. ७८/१/२/२/१ व गट नं.

७८/१/२/२/२ असे नमूद करणे आवश्यक आहे. त्यासाठी सदर मूळ नकाशा हा दुरूस्तीसाठी पाठविण्यात यावा अशी मागणी केलेली आहे.

**४)** प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी निशाणी क्र.५२ अन्वये अर्जास म्हणणे दाखल करून विरोध केलेला आहे. या प्रतिवादींचे कथन की, वादीचा अर्ज खरा व कायदेशीर नाही. त्यास मोजणीदाराने दुरूस्ती करावी म्हणून मागणी करता येणार नाही. मोजणी ही कोर्ट कमिशनर मोजणी म्हणून झालेली आहे. त्यामुळे सदरचा नकाशा कोर्टात शाबीत झाल्यानंतर प्रत्यक्ष हददीखुणा दाखविल्या जातात परंतू सदरचा नकाशा शाबीत होण्यापूर्वीच मागणी केलेली आहे. मोजणीदाराने मोजणीच्या वेळी आढळलेली परिस्थिती ही नकाशात नमूद केलेली आहे. मोजणीदाराच्या जाबजबाबाच्या वेळी ते शाबीत होणार आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

५) वादीचा अर्ज, त्यातील त्याची मागणी, त्यावरील प्रतिवादी क्र.३ व ४ यांचे म्हणणे व उलब्ध कागदत्रांचे अवलोकन केले असता, वादीच्या मागणीनुसार कोर्ट कमिशनर यांनी निशाणी क्र.४९ वरती अहवाल सादर केलेला आहे. त्यामध्ये मोजणी नकाशाची 'अ' प्रत दाखल केलेली आहे. वादीच्या कथनानुसार वादीचा गट नं. ७८/१/२/२/१ व गट नं. ७८/१/२/२/२ असा आहे. परंतू मोजणीदाराने नकाशामध्ये गट नं. ७८/२/२/१ व गट नं. ७८/१/२/२ असा दाखविलेला आहे. त्या कारणासाठी पुन्हा कोर्ट कमिशनर यांच्याकडे दुरूस्तीसाठी पाठविण्याची वादीने मागणी केलेली आहे. या ठिकाणी या वादीच्या या कारणाशिवाय दुसरे कारण दिसून येत नाही. या ठिकाणी वादीचे अर्जामध्ये दुसरे कथन नाही की, त्या ठिकाणी वादीशिवाय दुस—याचा गट नंबर दाखविलेला आहे. फक्त गट दाखविण्यामध्ये चुक झालेली आहे. या ठिकाणी या गोष्टीचा विचार करता वादी हा मोजणीदाराच्या पुराव्यामध्ये तशा प्रकारची चूक निदर्शनास आणून जबाबामध्ये दुरूस्त करू शकतो अथवा दुसरा ठोस पुरावा हजर करून मोजणीदाराने दाखविलेले गट नंबर चुकीचे आहेत असे शाबीत करू शकतो. त्यामुळे वादीने अर्जास दिलेले कारण हे योग्य व संयुक्तीक नाही. सदर दावा हा खूप जुना आहे. त्यामुळे पुन्हा कोर्ट कमिशनर यांच्याकडे पाठविणे योग्य होणार नाही. सबब, या व वरील कारणास्तव मी वादप्रश्न

क्र. १ चे उत्तर 'नाही' असे देत आहे.

**<u>वाद प्रश्न क्र.२ बाबत</u>**

**६)** या वाद प्रश्नाच्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**<u>::आदेश::</u>**

१. वादीचा अर्ज निशाणी क्र.५१ नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

**( एस. एस. इंदलकर )**

दिनांक : २२.०९.२०१७.

दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
माळशिरस

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this PDF file Order is same word to word as per the original Order.

(a) Name of the Stenographer : **S. S. Mitragotri**

(b) Court : **Civil Court Senior Division, Malshiras.**

(c) Order signed by P.O. on : **22.09.2017.**

(d) Order uploaded on : **27.09.2017.**